**<u>प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी नागपूर कोर्ट क्र. १ यांचे न्यायालयात.</u>**

(पिठासीन अधिकारी कौस्तुभ नागेश मराठे)

**नि.फौजदारी खटला नं.२२७/२०२४**
**निशाणी १४२**

**<u>दोषारोप</u>**

मी, **कौस्तुभ नागेश मराठे**, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर खालील प्रमाणे तुमचेवर दोषारोप ठेवत आहे.

१. **मंदार अनिरुध्द कोलते (व्हीसीवर हजर)**
वय ५१ वर्षे,
रा. प्लॉट क्र.१०६, फ्लॅट क्र.१, सेगुल अपार्टमेंट,
सुरेंद्रनगर, बजाजनगर, नागपूर.

२. **मंगेश उर्फ दिनेश वामन पाटेकर,**
वय ४० वर्षे.
रा. बिल्डींग क्र.६, ए विंग, रूम क्र.२४०२, विरार वेस्ट,
म्हाडा कॉम्पलेक्स, पालघर, मुंबई.

३. **सुरज डे उर्फ गोयल विष्णुपाडा डे (व्हीसीवर हजर)**
वय ३७ वर्षे
रा.कनकिय पार्क–१, ठाकूर कॉम्पलेक्स, बी/२०५,
कांदीवली ईस्ट, मुंबई.

४. **अल्पेश सुरेशभाई पटेल**
वय ३९ वर्षे,
रा. बी–३, नंदनवन सोसायटी, ठक्कर नगर, नरोडा,
अहमदाबाद, राज्य–गुजरात.

५. **मोहम्मद जवाद उर्फ भरत सुलेमान फारूख बोरा (व्हीसीवर हजर)**
वय ३५ वर्षे,
रा. ठाणे.

७. **राजू मंडल**
वय ४५ वर्षे,
रा. मलाड, मुंबई.

तुम्ही आरोपींनी इतर आरोपींसोबत आपापसात संगनमत करुन दिनांक ०७.१२.२०२२ ते ०३.०२.२०२३ चे दरम्यान आकृती जाहिरात एजन्सी फ्लॅट क्र.४ लक्ष्मी सदा अपार्टमेंट, साई मंदिर जवळ, वर्धा रोड, नागपूर येथे फिर्यादी नामे अंकुरकुमार रोहताश अग्रवाल यांना एक्स्ट्रीम नेटवर्क्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची माहिती देवून यामध्ये पैसे गुंतवल्यास तीन महिन्यात १५ ते २०% किंवा त्यापेक्षा जास्त रिटर्न मिळेल असे सांगून फिर्यादीकडून ५,३९,५०,०००/– रक्कम घेवून त्यांना परत केली नाही व त्यांची फसवणुक केली व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ४२० सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वैकल्पीकरीत्या वर नमुद काळामध्ये व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपापसात संगनमत करुन फिर्यादीने विश्वासाने सोपावलेली रक्कम ५,३९,५०,०००/– रूपये घेवून त्याचा अपहार केला व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ४०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वर नमुद काळामध्ये व ठिकाणी तुम्ही आरोपींनी इतर आरोपींसोबत आपापसात संगनमत करुन तोतयेगीरीने फिर्यादीकडून ५,३९,५०,०००/– रूपये घेवून त्याचा अपहार करून त्यांची ठकवणूक केली व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ४१९ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वर नमुद काळामध्ये व ठिकाणी तुम्ही आरोपींनी इतर आरोपींसोबत आपापसात संगनमत करुन खोटे व बनावट अग्रिमेन्ट आणि डिमांड ड्राफ्ट तयार केले व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ४६७ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वर नमुद काळामध्ये व ठिकाणी तुम्ही आरोपींनी इतर आरोपींसोबत आपापसात संगनमत करुन फसवणूक करण्यासाठी खोटे अग्रिमेन्ट आणि डिमांड ड्राफ्ट तयार केले खोटे व ते बनावट कागदपत्रे फसवणूक करण्याच्या उद्देशाने वापरले व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ४६८ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वर नमुद काळामध्ये व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपापसात संगनमत करुन अग्रिमेन्ट आणि डिमांड ड्राफ्ट बनावट असल्याचे माहित असताना सुध्दा ते तुम्ही कपटीपणाने व अप्रामाणिकपणे खरे म्हणून वापरले व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ४७१ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वर नमुद काळामध्ये व ठिकाणी तुम्ही आरोपींनी इतर आरोपींसोबत आपापसात संगनमत करुन तुम्ही लोकसेवक नाही हे माहीत असूनही, लोकसेवक असल्याचा खोटा दावा केला व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम १७१ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वर नमुद काळामध्ये व ठिकाणी तुम्ही इतर आरोपींसोबत आपापसात संगनमत करुन फिर्यादीस जास्त नफा होईल असे भासवून त्याच्याकडून ५,३९,५०,०००/– रूपये घेवून त्याचा अपराध करण्याचा फौजदारीपात्र कट रचला व त्यामुळे तुम्ही भारतीय दंड विधान कलम १२०–ब सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

आणि तुम्हास याद्वारे निर्देशीत करण्यात येत आहे की, तुमच्याविरुध्द उपरोक्त दोषारोपांवर खटल्याची चौकशी होईल.

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.05.11 17:30:55 +0530

**नागपूर.** **(कौस्तुभ नागेश मराठे)**
**दि.११/०५/२०२६** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर.**
**कोर्ट क्र.१.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की वरील दोषारोप मधील मजकुर आरोपींना त्यांचे मातृभाषेतुन व्हीसीद्वारे व समक्ष वाचून व समजावुन सांगितला.

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.05.11 17:31:06 +0530

**नागपूर.** **(कौस्तुभ नागेश मराठे)**
**दि. ११/०५/२०२६** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर.**
**कोर्ट क्र.१.**